स्थापना १९७२

# एस डी सी बँक

वि साहेबराव देशमुख को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय : १०३, ट्रेड कॉर्नर, साकीनाका जंक्शन, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ७२
फोन : २८५२ ०३६९ / २८५२ ८७१४ फॅक्स : २८५२ ४५००

**(फक्त बँकेच्या सभासदांकरिता)**

## ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

आपणास कळविण्यात येते की, सध्याच्या कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशाचे पालन करणेकरीता तसेच यापूर्वी महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.२५.०२.२०२१ रोजीच्या परिपत्रक क्र. संकीर्ण - २०२०/प्र.क्र. २४/१३-स अनुसार जाहीर केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार बँकेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २९/०९/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजता बँकेचे अध्यक्ष मा. श्री. बिपिन शशिकांत कुडतरकर यांचे अध्यक्षतेखाली मे. गार्गी एन्टरप्रायजेस, १०, गणेश कृपा, सुभाष नगर, एन. एम. जोशी मार्ग, चिंचपोकळी, मुंबई - ४०००११ येथे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. सभेस सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. तरी बँकेच्या ३१ मार्च २०२१ किंवा त्यापूर्वीच्या सर्व नोंदणीकृत सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेण्याकरिता आपले नांव, पत्ता, आपला सभासद क्रमांक, मोबाईल क्रमांक, व ई-मेल आयडी, फोटो, आधार कार्ड व पॅन कार्डच्या स्वयंसाक्षांकित (Self attested) प्रतींसह, बँकेच्या **shares@sdcbank.in** वर दिनांक २३.०९.२०२१ अखेर सायं. ५ वाजेपर्यंत नोंदवावे ही विनंती. यामुळे बँकेला सर्व सदस्यांना त्याच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर किंवा ई-मेल आयडीवर ओएव्हीएमद्वारे (Other Audio Visual Means) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचना विना व्यत्यय पाठविणे सुलभ होईल. सभेपूर्वी सभेची लिंक सभासदांना पाठविण्यात येईल. तरी या सभेस सभासदांनी सभेच्या नमूद वेळेच्या १५ मिनिटे आधी लिंक वर जॉईन व्हावे ही विनंती. काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

**व्हिडीओ मिटींगची लिंक सभासदांना एसएमएस/ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल.**

**- सभेपुढील कामकाज -**

१. दिनांक २५/०३/२०२१ रोजी ओएव्हीएमद्वारे झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. संचालक मंडळाने दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपणाऱ्या वर्षाचा सादर केलेला अहवाल व लेखा परीक्षकाने तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करून तो स्वीकृत करणे.

३. सन २०२०-२१ च्या वैधानिक हिशोब तपासनिसांच्या अहवालावर विचारविनिमय करणे.

४. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखा परिक्षक म्हणून नेमणूक होण्यासाठी संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार मे. शिंदे//नायक अॅन्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौन्टंटस् व मे. यार्दी प्रभू अॅन्ड असोसिएटस् एलएलपी चार्टर्ड अकौटंटस् या दोन फर्म्सपैकी एका फर्मची नियुक्ती करण्यास मंजूरी मिळणेबा[illegible]चा प्रस्ताव रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांना पाठविला असून त्यांच्या मंजूरीप्रमाणे वैधानिक लेखापरिक्षक याची नेमणूक करण्याचे अधिकार तसेच त्यांचा मेहनताना महाराष्ट्र शासनाच्या मेहनताना बाबतच्या दि.२९.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार देण्यास संचालक मंडळास अधिकार देणे.

५. एकरकमी कर्ज परतफेड योजने (OTS) अंतर्गत तडजोड केलेल्या कर्ज खात्यांची माहिती सभेस देऊन मंजुरी घेणे.

६. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या दि. ०७.०१.२०२१ रोजीच्या दिलेल्या ई-मेल पत्रानुसार बँकेच्या उपविधीत Board of Management (BOM) ची स्थापना करण्याची तरतूद करणारे वाढीव कलम मंजूर करणे.

७. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या दि. ०७.०१.२०२१ रोजीच्या दिलेल्या ई-मेल पत्रानुसार बँकेमध्ये Board of Management (BOM) ची स्थापना करण्यात आली त्यास कार्योत्तर मंजूरी देणे.

८. श्री. दिलीप देविदास जोशी यांची बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून दि.०२.०९.२०२० पासून संचालक मंडळाने केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे.

९. बँकेच्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर [illegible]लेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१०.मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या इतर विषयांवर विचार करणे.

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : १५/०९/२०२१**

सील

**संचालक मंडळाच्या आदेशाने**
**श्री. दिलीप देविदास जोशी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**-: विशेष सूचना :-**

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा ठरलेल्या लिंकवर ओएव्हीएमद्वारे (Other Audio Visual Means) ऑनलाईन पद्धतीने अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. बँकेचा ४९ वा वार्षिक अहवाल बँकेच्या www.sdcbank.in ह्या वेबसाईटवर माहितीसाठी उपलब्ध आहे.

३. ज्या सभासदांना लेखी सूचना किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले लेखी प्रश्न किंवा सूचना दि. २३.०९.२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत बँकेच्या shares@sdcbank.in या ई-मेल आयडीवर पाठवावेत.

४. ज्या सभासदांनी आपली भागपत्रके घेतली नसतील त्यांनी बँकेच्या कामकाजाच्या वेळात आपली भाग पत्रके बँकेच्या मुख्य कार्यालय/नजीकच्या शाखेतून घेऊन जाण्याची कृपा करावी.